## <u>आदेश निशाणी क्र.२२ खाली</u>

## (दि.१६.०७.२०२२)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.६ ने तिचे विरोधात झालेला एकतर्फा आदेश रद्द करुन मिळणेकरीता व लेखी कैफीयत दाखल करणे करीता दाखल केला आहे.

०२. प्रतिवादी क्र.६ यांनी कथन केले की, प्रतिवादी क्र.६ हजर नसल्यामुळे तिच्या विरोधात एकतर्फा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. आजरोजी तिला सदरचा आदेश रद्द करुन लेखी कैफीयत दाखल करावयाची आहे. म्हणुन प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आला.

०३. वादींनी कथन केले की, योग्य तो आदेश खर्चासह करण्यात यावा.

०४. मुळ दावा मौजा येवला येथील गट क्र.११४, ११५ व बोररांजणी येथील गट क्र.७४ बाबत वाटणी होवुन स्वतंत्र ताबा मिळणेकरीता दाखल केला आहे. अभिलेखाची पाहणी केली असता असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी दाव्याची लेखी कैफीयत नि.क्र.१९ प्रमाणे दाखल केलेली आहे. प्रतिवादी क्र.६ ला तिची लेखी कैफीयत दाखल करण्याची परवानगी देणे योग्य ठरणार आहे.

०५. अशास्थितीमध्ये वादींची व प्रतिवादींचे शेतजमीनी संदर्भात हक्क व जबाबदा–या दाव्यामध्ये निगडीत आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.६ ला लेखी कैफीयत व मनाई हुकूम अर्जाचे उत्तर दाखल करण्याची परवानगी देणे न्यायोचित ठरणार आहे. अर्ज मंजूर झाल्यास वादींचे कुठलेही नुकसान होत नाही. मुळ दावा गुण दोषावर ठरविण्यासाठी प्रतिवादी क्र.६ ला

त्यांची लेखी कैफीयत व मनाई हुकूम अर्ज दाखल करण्याची परवानगी देणे गरजेचे आहे. म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करतो,

**<u>आदेश</u>**

१) अर्ज मंजुर करण्यात येतो.

२) दि.२६.०८.२०२१ रोजीचा प्रतिवादी क्र.६ विरोधात पारीत झालेला एकतर्फा आदेश रुपये २००/– च्या खर्चासह रद्द करण्यात येत आहे. खर्चाची रक्कम वादींना द्यावी.

३) खर्चाची रक्कम दिल्यानंतर प्रतिवादी क्र.६ ला तिची लेखी कैफीयत दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
SACHIN BHAGVAT
SHIRSATH
Date: 2022.07.19
10:06:24 +0530

**(स. भा. शिरसाठ)**

दिनांक १६/०७/२०२२

दिवाणी न्यायाधीश (क. स्तर),
घनसावंगी.